# // प्रेस नोट //

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दरवर्षीप्रमाणे जैन धर्मियांचे पर्युषण पर्व यावर्षीही साजरे होत असून सदरच्या पर्युषण पर्व काळात मांस विक्रीची दुकाने बंद ठेवणे बाबत महाराष्ट्र शासन, यांचे कडील संकीर्ण-10/2004/प्र.क्र.121/नवि-20, नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई-400032 दिनांक 07 सप्टेंबर 2004 रोजीचा निर्णय आहे. मा. उच्च न्यायालयातील जनहित याचिका स्टॅम्प क्र. 26591/2024 मधील दि. 29/08/2024 रोजीचा आदेश, व मा. श्रीम. गीता भरत जैन, आमदार -मिरा भाईंदर क्र. GBJ/1222/2024, दि.30/08/2024 रोजीचे जैन धर्माच्या पवित्र पर्युषण पर्वातील आठ दिवस शहरातील मास विक्रीची दुकाने बंद ठेवणेबाबतचे प्राप्त झाले होते.

मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या अनुषंगाने मा. अति-आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे यांच्या दालनात आज दि. 30/08/2024 रोजी सकाळी 11.00 वाजता बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीस सोबत जैन समाजाचे प्रतिनिधी तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विक्रम निराटले उपस्थित होते. सदर बैठकीस उपस्थित प्रतिनिधी यांना शासनाचे निर्णय व त्यावर महापालिकेने घेतलेले निर्णय याबाबतची संपुर्ण माहिती देण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासकिय ठराव क्र.199, दि. 11/09/2023 अन्वये सन 2024 पर्युषण पर्व दिनांक 30/08/2024 ते दिनांक 07/09/2024 या काळात साजरे होत आहे .शासनाच्या निर्णयाप्रमाणे श्रावण वद्य 12 म्हणजे दिनांक 30/08/2024 व भाद्रपद शुक्ल 4 म्हणजेच दिनांक 07/09/2024 या दिवशी मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मास विक्रीची दुकाने बंद ठेवण्यात यावेत व पर्युषण काळातील इतर दिवशी दुकाने बंद ठेवणे बाबत आवाहन करण्यात येत आहे याची नागरिकांनी नोंद घ्यावी.

**(संजय दोंदे)**
**उप-आयुक्त (पशुसंवर्धन)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**